# रारंग ढांग – प्रभाकर पेंढारकर

**लेखक परिचय :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात बदललेल्या परिस्थितीचे चित्रण मराठीतील अनेक कादंबऱ्यात येऊ लागले. चि. त्र्यं. खानोलकर, भालचंद्र नेमाडे, व्यंकटेश माडगूळकर, हमीद दलवाई अशा अनेक कादंबरीकारांनी आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने मराठी कादंबरीला नव्या वळणावर नेले. प्रभाकर पेंढारकर ह्या प्रवाहामध्ये लिहिणारे एक नाविण्यपूर्ण कादंबरीकार होत.

प्रसिद्ध मराठी चित्रपट दिग्दर्शक, चित्रतपस्वी भालजी पेंढारकर आणि सरस्वतीबाई पेंढारकर यांचे ते चिरंजीव. प्रभाकर पेंढारकर यांचा ८ सप्टेंबर १९३२ रोजी जन्म झाला. 'मीठभाकर' या सिनेमात बालकलाकार म्हणून त्यांनी काम केले. पुढे दिग्दर्शक, कथाकार पटकथाकार, कादंबरीकर असा त्यांचा प्रवास झाला. त्यांनी 'बाल शिवाजी' या सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे. तसेच त्यांनी भालजी पेंढारकर, राजाभाऊ परांजपे आणि व्ही. शांताराम यांच्याकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. अनेक चित्रपटांचे लेखन – दिग्दर्शन त्यांनी केले. पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली. **'प्रतीक्षा', 'तपोवन', 'चक्रीवादळ', 'आज अचानक गाठ पडे', 'हरवलेला मधुचंद्र', 'अरे संसार संसार', 'रारंग ढांग'** ह्या वेगळया प्रकारच्या कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले. 'अरे संसार संसार' ही मुंबईसारख्या महानगरामधील मध्यमवर्गीयांच्या सांसारिक ओढाताणीचे चित्रण करणारी कादंबरी आहे.

प्रभाकर पेंढारकर यांनी फिल्म डिव्हीजनमध्ये काम करताना अनेक लघुपटांची (शॉर्ट फिल्म) निर्मिती केली. त्यापैकी एक म्हणजे बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनसाठी त्यांनी बलवलेला लघुपट. या निमित्ताने 'किन्नोर कैलास' या हिमालयातील (हिमाचलप्रदेशजवळील भारत – तिबेट सीमा) परिसरात काही काळ वास्तव्य केले. त्यांना आलेल्या अनुभवावर ही 'रारंग ढांग' कादंबरी बेतलेली आहे. १९८१ साली प्रसिद्ध झालेल्या 'रारंग ढांग' या कादंबरीच्या आजवर आठरा आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. २०१९ साली या कादंबरीची अठरावी आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

**'रारंग ढांग'ची निर्मिती प्रक्रिया :**

'रारंग ढांग' ह्या कादंबरीची निर्मिती प्रक्रिया ही पूर्णपणे हिमालयातील बिकट निसर्गाचे आव्हान स्वीकारून सरहद्दीवर रस्ते बांधण्याचे काम करणाऱ्या सैनिकी अधिकाऱ्यांच्या जीवनाशी संबंधित आहे. 'रारंग

ढांग' या कादंबरीचा विषय साहसप्रधान आहे. 'बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन' ही संस्था हिमालयात अतिशय उंचावर रस्ते बांधते. जगात कुठेही न घडणारी अशी घटना म्हणता येईल. त्याचाच एक भाग म्हणून हिमालय पर्वताच्या उभ्या कडयामधून रस्ता काढण्याचा साहसपूर्ण अनुभव हा या कादंबरीचा मुख्य विषय आहे. **'रारंग ढांग' ही कादंबरी हिमालयातील दुर्गम नैसर्गिक परिस्थिती आणि त्या दुर्गम परिस्थितीवर अगम्य इच्छाशक्तीने झुंज देणाऱ्या एका तरूण लेफ्टनंट विश्वनाथ मेहेंदळे यांच्या नैतिक पराभवाची तात्त्विक मीमांसा करणारी कादंबरी आहे.** विश्वनाथ मेहेंदळे यांनी जे अनुभवलं; त्या प्रत्यक्ष अनुभवाचं दृश्य चित्रण करणारी ही कादंबरी आहे.

**'रारंग ढांग'ची अर्पणपत्रिका :**

मराठीतील नामवंत कादंबरीकार श्री. विश्राम बेडेकर यांना लेखक प्रभाकर पेंढारकर यांनी ही कादंबरी अर्पण केली आहे. विश्राम बेडेकर यांनी 'रणांगण' कादंबरीत तात्त्विकपणे द्विधामनस्थितीचे चित्रण केले आहे. तीच प्रेरणा घेऊन लेखक प्रभाकर पेंढारकर यांनी विश्वनाथ मेहेंदळे याचे चित्रण या कादंबरीत केले आहे.

**'रारंग ढांग'चे मुखपृष्ठ :**

'रारंग ढांग' चे मुखपृष्ठ बाळ ठाकूर यांनी रेखाटले आहे. मुखपृष्ठावर काळया पिवळया रंगात डोंगर दाखवले आहेत. खाली एक व्यक्ती उभा आहे. मध्यभागी पुस्तकाचं आणि लेखकाचं नाव लिहिले आहे.

**'रारंग ढांग' या कादंबरीचे कथानक अथवा आशयसूत्र :**

'रारंग ढांग' या कादंबरीचे कथानक हे पूर्णपणे हिमालयातील बिकट निसर्गाचे आव्हान स्वीकारून सरहद्दीवर रस्ते बांधण्याचे काम करणाऱ्या सैनिकी अधिकाऱ्यांच्या जीवनाशी संबंधित आहे. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन ज्या उंचीवर रस्ते बांधते; ते जगात कुठेही बांधले जात नाहीत. पण त्या मागे कष्ट करण्यास प्रेरणा देणारे तत्त्व, ताणेबाणे आणि त्यातला संघर्ष या कादंबरीत चित्रित झाला आहे. **निसर्ग आणि मानव यांच्यातील रस्सीखेच, मानव आणि मानवातील रस्सीखेच, कामाला आणि गुणवत्तेला महत्त्व देणारा लेफ्टनंट विश्वनाथ मेहेंदळे, ठरलेल्या वेळात लष्करी शिस्तीने कामाला प्राधान्य देणारे लष्करी अधिकारी यातून कुठल्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचं यातून हा तात्त्विक संघर्ष या कादंबरीत उभा राहिला आहे.**

'ढांग' हा शब्द स्थानिक भाषेत हिमालयातील एखाद्या उभा असलेल्या नितळ कडयासाठी वापरला जातो. त्यातलाच एक हा 'रारंग ढांग' आहे. 'रारंग' नावाच्या एका ढांगावर रस्ता बांधण्यासाठी विश्वनाथ मेहेंदळे

नावाचा मुलकी अधिकारी (सिव्हिलीयन ऑफिसर) नियुक्त केला जातो. त्याला रस्ता बांधताना काय काय अडचणी आल्या; याची ही कथा आहे.

'रारंग ढांग'च्या कथानकाचे आशयसूत्र म्हणजे मुंबईमध्ये चांगली नोकरी असणारा विश्वास मेहेंदळे हा मराठी तरूण मुंबईतील सुखाची, भल्या मोठया पगाराची नोकरी सोडून हा मुलकी इंजिनियर म्हणून सतलज नदीजवळ बनणाऱ्या रस्त्याच्या कामावर रूजू होतो; येथून कादंबरीच्या प्रवासाला सुरूवात होते. हिमालयाची प्रचंड उंची, ऑक्शिजनचे विरळ प्रमाण, कडाक्याची थंडी, हिवाळयात साठणारे बर्फ, वारंवार होणाऱ्या अकल्पित लॅंडस्लाईडस यामुळे येथे काम करणाऱ्या माणसांना फार साहसपूर्ण आयुष्य जगावे लागते.

भारतीय सैन्यातील इंजिनीअरिंग विभागाचा मेजर जनरलच्या हुद्दा आणारा अधिकारी हा बॉर्डर रोडचा प्रमुख डायरेक्टर जनरल असतो. प्रत्येक प्रकल्पावर एक प्रमुख इंजिनीअर आणि त्याच्या हाताखाली, अनेक ठिकाणी चाललेल्या वेगवेगळया कामांवर देखरेख करण्यासाठी टास्क फोर्स कमांडर्स असतात. कामाच्या स्वरूपानुसार, ठिकठिकाणी फील्ड कंपन्यांची ऑफिसेस अथवा डिटॅचमेंट्स उभारल्या जातात. त्यावर सैन्यामधून इंजिनीयर्स घेतले जातात. तसेच मुलकी इंजिनीयर्सची तीन किंवा पाच वर्षांसाठी नेमणूक केली जाते. प्रत्येक टास्क फोर्समध्ये आठ ते दहा हजार माणसे असतात. त्यातले काही सैन्यातले जवान, तर बरेचसे ग्रेफ (GREF) चे. GREF म्हणजे जनरल रिझर्व्ह इंजिनीअर फोर्स. ह्या व्यतिरिक्त आजूबाजूच्या भागातले लोकही स्थानिक लेबर म्हणून कामावर घेतले जातात.

एका बाजूला हिमालय आणि तेथला विचित्र निसर्ग आणि दुसऱ्या बाजूला वेगवेगळया स्वभावाची पण सारख्याच जिद्दीची माणसे इथे काम करीत असतात. या दोहोंमधला स्वाभाविक संघर्ष साहसाच्या रूपात कादंबरीकाराने जिवंत केला आहे. सैन्यातले अधिकारी, सैन्यातली शिस्त आणि वेळेला प्राथमिक महत्त्व देऊन, आपापल्या पद्धतीने काम करीत असतात. त्याप्रमाणे मुलकी इंजिनीयर्सही आपल्या पद्धतीने कामाच्या गुणवत्तेला महत्त्व देऊन काम करीत असतात. सैन्यातली ताठर शिस्तबद्ध कार्यप्रणाली आणि मुलकी अधिकाऱ्याची लवचिक कार्यप्रणाली यांत संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष या कादंबरीतून उठावदारपणे प्रतीत होतो. 'रारंग ढांग' कादंबरीची ही सर्वसाधारण पार्श्वभूमी आहे.

'रारंग ढांग' ही व्यक्तिमत्त्वप्रधान कादंबरी आहे. एका विशिष्ट व्यवस्थेत, त्या व्यवस्थेची कार्यपद्धती, तेथील वातावरण, यामुळे व्यक्तिमत्त्वांचे जे वर्तन घडते; तेच या व्यक्तिमत्त्वांची ओळख पटविते. या कादंबरीत

लष्करी व्यवस्थेतील विविध अधिकाऱ्यांना अशी ओळख प्राप्त झालेली आहे. विश्वनाथ मेहेंदळे हा सिव्हिल इंजिनीयर असलेला मुलकी अधिकारी, पण तो ध्येयप्रेरणेने लष्करात दाखल होतो. लष्कराच्या कडक कायदेकानूनांशी प्रामाणिक राहतो; पण त्यांना मानव्याचे परिमाण देण्याचा प्रयत्न करतो. परिणामत: विश्वास मेहेंदळे याची निराळी ओळख सिद्ध होते.

लष्कराच्या व्यवस्थेत जखडबंद झालेले इतर अधिकारी आणि लष्करी व्यवस्थेचे पोलादी चिलखत पांघरूनही लष्कराचे काम करताना निर्माण होणाऱ्या विविध मानवी मूल्यांचा विचार करून, त्यांची जोपासना करणारा विश्वास मेहेंदळे यांच्या परस्पर वर्तनाची व्यापक कहाणी या कादंबरीत येते.

या कादंबरीला रूढार्थाने सामाजिक परिमाण नाही. हिमालयाची पार्श्वभूमी आहे; जिथे सगळी परिस्थिती प्रतिकूल आहे. जीव टांगणीला लावून काम करावे लागते अशा बिकट जागा आहेत.

लष्कराच्या टास्क फोर्समधील विविध कंपन्यांतील मोजक्या कर्मचाऱ्यांचा तात्पुरता रहिवास असे एकसाची आणि अस्थिर जनजीवन या कादंबरीत आहे. लष्करी व्यवस्था आखीव वेळापत्रकाप्रमाणे, यांत्रिकपणे काम करते. हिमालय, त्याची हिमशिखरे, किन्नोर कैलास, खाली खोलवर धोंकार करीत वाहत जाणारी सतलज नदी, अशा स्थिर आणि विराट पार्श्वभूमी या कादंबरीत येते. स्थिर विराट पार्श्वभूमी व लष्करी स्थिर कार्यपद्धतीची पार्श्वभूमी यामुळे येथील कामाचे आव्हान फारच मोठे ठरते.

लष्कराच्या दृष्टीने रस्ते हे सैनिकांचे एक शस्त्ररूपी साधन असते. एका विशिष्ट वेळेत वेगाने ते पूर्ण करणे हे लष्कराचे ध्येय असते. यामुळेही हे आव्हान यांत्रिकपणे पेलणे हा लष्करी कामकाजाचा खाक्या ठरतो. विश्वनाथ मेहेंदळे हा अवघ्या चोवीस वर्षांचा तरूण, परीक्षेत सुवर्णपदक मिळविलेला बुद्धिमान नागरी इंजिनीयर, काहीतरी आव्हानात्मक काम करायला मिळावे म्हणून या सेवेत दाखल होतो. त्याच्या स्वविशिष्ट कामकाजामुळे लष्कराच्या कार्यपद्धतीचे अंतरंग आणि त्याच्या अभ्यासू कार्यपद्धतीमुळे हिमालय व परिसरातील बिकट जागी काम करणे हे फार आव्हानात्मक असल्याचे त्याच्या लक्षात येते. स्थिर व्यवस्थांच्या पातळीवरच्या विश्वनाथ मेहेंदहेंचे गतिमान व्यक्तिमत्त्व व त्याच्याकडून होणाऱ्या विविध कृतींनी या कादंबरीचे कथानक व्यापलेले आहे.

यामुळे कादंबरीच्या कथानकातून विश्वनाथच्या असाधारण व्यक्तिमत्त्वाची ओळख पटते व तो कादंबरीचा नायक असल्याचे लक्षात येते. विश्वनाथ मेहेंदळे ही ध्येयवादाचा वारसा प्राप्त झालेली व्यक्ती आहे. कोकणातल्या अंबेरीसारख्या एका छोटयाशा अविकसित खेडयात स्वातंत्र्य सैनिक असलेल्या विश्वनाथच्या

पित्याने शिक्षकीपेक्षा पत्करून मुक्काम ठेवला आहे. या शिक्षक पित्याने आपली सारी मिळकत मुलाच्या शिक्षणावर खर्च करून त्याला इंजिनीयर केले. छोटयाशा गावात जितका सुतार, गवंडी, शिक्षक, वाणी यांचा उपयोग होतो, तितका सिव्हिल इंजिनीयरचा उपयोग नसतो; म्हणून केवळ हा इंजिनीयर मुलगा मुंबईला जाऊन युनायटेड कन्स्ट्रक्शनसारख्या मातब्बर कंपनीत नोकरी पत्करतो. आपल्या पहिल्या पगाराची मनिऑर्डर हा मुलगा आपल्या वडिलांना पाठवतो, तेव्हा मला पैसै लागतात कशाला? असे म्हणून वडील ती मनिऑर्डर परत पाठवितात. तेव्हा अधिक पैसा तरी कशाला मिळवायचा हे संस्कारांचे बीज विश्वनाथच्या मनात पडते व ज्या कामाने आनंद मिळेल असे काम स्वीकारायचे, असा निर्णय तो घेतो. या निर्णयाबरहुकुम लष्कारतली ही नोकरी तो स्वीकारतो. चरितार्थाची सोय व पैसा मिळविणे हे नोकरीचे सर्वसामान्य हेतू विश्वनाथच्या संदर्भात राहातच नाहीत. मुंबईतील नोकरी विश्वनाथने सोडली याचा त्याच्या वडिलांना फारच आनंद होतो. त्यांच्या मते मुंबईचा माणूस हा सापळयात सापडलेल्या उंदरासारखा असतो. कितीही धावला तरी जो ज्या जागी असतो, त्याच जागी राहतो. हिमालयाच्या शांततेचा उपयोग कसा करून घ्यावा व यामुळे काय साधेल याबद्दल मार्गदर्शन करताना त्यांनी पत्रातून लिहिले आहे; ते असे – ''हिमालयात तुला निदान शांतता मिळेल, जी मुंबईच्या माणसानं कायमची गमावलेली आहे. ही शांतता स्वत:शी बोलण्यासाठी वापर. 'मी कोण?' हा विश्वातला सगळयात मोठा गहन प्रश्न स्वत:ला पाहणे हाही साक्षात्कार होऊ शकतो. मी हे काम करतो या प्रश्नाचे उत्तर शोधणारा माणूस जसा अनावश्यक अनेक गोष्टी टाळतो तसा काही गोष्टी कोणत्याही परिस्थितीत झाल्याच पाहिजेत ह्या निर्धाराने उभे राहायचे ठरवितो. ह्या गोष्टी कोणत्या हा शोध प्रत्येकाने स्वत:च घ्यायचा असतो. त्या एकदा ठरल्या की त्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता झगडणं हाच जीवनाचा उद्देश असतो; असे मला वाटते.'' विश्वनाथच्या वृद्ध पित्याचे हे मनोगत म्हणजे त्यांची जीवनविषयक भूमिका आहे. विश्वनाथकडे एक पैतृक वारसा म्हणून ती आलेली आहे. इथे हिमालयात रक्ताच्या ऐवजी, विचारांचा आणि कृतीचा वारसा वडिलांकडून लाभेल अशीही अपेक्षा विश्वनाथ ठेवतो.

असा वारसा लाभलेला विश्वनाथ मेहेंदळे हा तीन वर्षांसाठी **बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन** या संस्थेत दाखल होतो. विश्वनाथ आपल्या कामाच्या ठिकाणापर्यंत जीपने जायला निघतो. **ग्यानचंद** नावाचा जीप ड्रायव्हर जीप चालवत असतो. पहाडावरच्या नागमोडी रस्त्याने जीप जात असते. ग्यानचंद एका वळणावर जीप बाजूला थांबवून सुभेदार मेजर साहबना सलाम करून येतो म्हणून सांगतो. विश्वनाथही त्याच्या पाठीमागे जातो. एक

चबुतरा बांधलेला असतो. त्यावर चुन्याने सफेद अक्षरे लिहिलेली असतात. : **सुभेदार मेजर प्रतापसिंग**. ग्यानचंद या सुभेदार मेजर प्रतापसिंगांची 'लंबी कहानी' विश्वनाथला ऐकवतो. दुसऱ्या दिवशी पहाटे दिल्लीला जाणारा ट्रक भरण्यासाठी कॅप्टनसाहेब सुभेदारांना फटीग पार्टीला बोलवायला सांगतात. महिनाभर काम करीत असलेल्या व झोपलेल्या फटीग पार्टीला झोपेतून उठवून कामाला लावायला सुभेदार नकार देतो. वाटल्यास दुसऱ्या दिवशी सकाळी सामान भरून देऊ, असे सांगतो. पण कॅप्टनचा हुकूम कायम असतो आणि इकडे सुभेदार साहेबांचा निर्णय पक्का असतो. या छोटयाशा गोष्टीमुळे प्रतापसिंगांना चार्जशीट केलं जातं. त्यांच्या नावापुढे कायमचा धब्बा लागतो. प्रतापसिंगांचं प्रमोशन लांबतं. रिटायर व्हायची वेळ येते तरी प्रमोशन मिळत नाही. कर्नल साहेबांच्या रदबदलीमुळे कसेतरी प्रमोशन मिळते. पण त्या आधीच प्रतापसिंगांचा ट्रकने प्रवास करताना म्हणजे निवृत्तीपूर्व रजा संपवून डयुटीवर जाताना – अपघात होऊन मृत्यू होतो. ट्रक सहाशे फूट खाली सतलजमध्ये कोसळतो. आपल्याला प्रमोशन मिळाल्याचे सुभेदार साहेबांना काहीच माहीत नसते. सुभेदार मेजर होण्याची त्यांची ख्वाईश अधुरीच राहते. सुभेदार मेजर होण्याची त्यांची स्वत:ची इच्छा असल्यामुळे व इतरांनाही त्यांना प्रमोशन मिळून ते सुभेदार मेजर व्हावेत असे वाटत असल्यामुळे, अपघाताच्या ठिकाणी चबुतरा बांधून ही अक्षरे लिहिलेली असतात. ही कहाणी सांगून झाल्यावर ग्यानचंद विश्वनाथला एक मूलभूत प्रश्न विचारतो. तो म्हणजे : **''साब एक बात बताइए ! जब आदमी मर जाता है तो उसका क्या रहता है ?''** या प्रश्नाने विश्वनाथ अंतर्मुख होणे स्वाभाविक आहे. संपूर्ण कादंबरीभर हा प्रश्न ध्रुवपदासारखा आवृत्त होतो. या कादंबरीतला हा एक मूल्यात्मक प्रश्न आहे. कादंबरीच्या शेवटी विश्वनाथने सद्हेतूने आपल्या स्वतंत्र बुद्धीचा वापर करून, रारंग ढांगा वरिष्ठांच्या परवानगीशिवाय, आठ खांब उभारून लाईनिंग केल्याबद्दल त्याला अटक होते. **कोर्ट मार्शल** होते. विश्वनाथचा सद्हेतू लक्षात घेऊन कोर्ट त्याला दोषमुक्त करते, पण तीन वर्षांचा करार रद्द करून त्याला मुदतीपूर्वी निवृत्त करते. विश्वनाथ परतीच्या प्रवासाला निघतो. जीपने प्रवास चाललेला असतो. सुभेदार मेजर प्रतापसिंगांच्या चबुतऱ्याची जागा येते, विश्वनाथ जीपमधून उतरतो. जमिनीत खोदलेल्या पायऱ्या उतरून तो दगडी चबुतऱ्यावर रस्त्याच्या बाजूची खुडून नेलेली रानफुलं ठेवून स्तब्ध उभा राहतो. ग्यानचंदने विचारले होते की माणूस मरतो तेव्हा मागे काय उरते? त्याचे उत्तर केवळ चबुतराच राहतो असे नाही, तर ज्या कितीतरी अधिक गोष्टी राहतात, त्यांपैकी एक म्हणजे त्या **माणसाची स्मृती.** या स्मृतीला साक्षी ठेवून विश्वनाथने ठरविले होते की, आपण करीत असलेल्या रस्त्यावर, नाइलाजाने लादलेल्या हौतात्म्याची स्मारके बांधायची नाहीत. पण

सात स्मारकं बांधली गेली याचे दु:ख विश्वनाथला बोचत राहते. अर्थात ही स्मारके लष्करी व्यवस्थेला आपल्या सत्तेच्या व अधिकारांच्या मर्यादा दाखवून देतील. त्यामुळे हे बलिदान व्यर्थ जाणार नाही, असा त्याला विश्वास वाटतो. ज्या उमेदीने विश्वनाथ लष्करात दाखल झाला होता व जे अपयश पदरी घेऊन परतत होता, ह्या दोन बिंदुंमध्ये या कादंबरीचा कालावकाश साठलेला आहे. या कालावकाशात अनेक घटनाप्रसंग घडतात. या घटनाप्रसंगांमुळे अनेक मूल्यात्मक प्रश्न उपस्थित होतात. एखादे उदाहरण या संदर्भात पाहणे उद्‌बोधक ठरेल.

रारंग ढांगावर रस्ताआखणीच्या ज्या खुणा केलेल्या होत्या, त्याकरता त्यांनी जे सॉइल सॅपल घेतलेले असतील, त्याचे ज्युओलेटिक सर्व्हेरिपोर्टस पाहण्याची गरज, **विश्वनाथ मेजर बंबांपाशी** बोलून दाखवतो. कारण ढांगाच्या मधला तीस एक फुटांचा पट्टा मोठा बेभरवशाचा वाटत असतो. तिथले सॅपल घेण्यासाठीच विश्वनाथने कॉप्रेसर मागवून घेतलेला असतो. तिथला दगड ठिसूळ असल्यामुळे, त्यावर वरच्या पहाडाचा भार पेलणं कठीण असल्याचे विश्वनाथच्या लक्षात आलेले असते. तसेच मेजर बंबांनी पुलाची जी जागा दाखवली होती, ती बदलण्याचा प्रयत्न करून इतर वेगळयाच अडचणी निर्माण होतील असे वाटल्यामुळे, त्याच जागी आधारासाठी सिमेंटचे खांब उभारून कॉंक्रिट लायनिंग करणे अधिक सोयीस्कर असल्याचे विश्वनाथला वाटते. पण रस्त्याची अलाइनमेंट आणि पुलाची जागा ठरलेली असल्यामुळे, त्यात बदल करता येणार नाही असे मेजर बंब ठामपणे सांगतात. हा रस्ता बांधणं ही गोष्ट धोक्याची असल्याचे विश्वनाथही स्पष्टपणे सांगतो. इंजिनीयरिंगच्या शास्त्राचा त्याला आधार असल्याचे तो सांगतो आणि शास्त्राच्या विरूद्ध काही करायला सांगू नका, अशी विनंतीही करतो. त्या दोहांतील काही संवाद प्रत्यक्षच पाहू :

मेजर बंबा खूर्चीवरून उठले, टेबलाला वळसा घालून विश्वनाथसमोर येऊन उभे राहिले आणि म्हणाले, ''लेप्टनंट विश्वनाथ, मीही इंजिनीअर आहे आणि तुझ्यासारख्या ज्युनिअर ऑफिसरकडून मला उपदेशाची गरज नाही.''

मेजर बंबा यांच्या नजरेला नजर देत विश्वनाथ शांत आवाजात म्हणाला, ''मी ज्युलिअर अधिकारी आहे हे मला माहीत आहे. पण ज्युनिअर अधिकाऱ्याचं प्रत्येक गोष्टीला 'हो' म्हणणं एवढंच काम असतं काय? मला वाटतं, त्यांचं काम हे की आपल्यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यास आवश्यक ती सर्व मदत करणं की ज्यामुळं ते योग्य निर्णय घेऊ शकतील.''

''आणि जर त्यांनी ऐकलं नाही तर.''

''तुम्ही ऐकाल. कारण सैन्यातदेखील इंजिनीअरिंगचे तेच नियम असतात आणि आर्मी अधिकारी कितीही वरिष्ठ असला तरी निसर्गावर त्याची हुकमत चालू शकत नाही.''

''संपलं बोलून? आता माझं ऐकं. तुझं इंजिनीअरिगचं ज्ञान, आणि येथल्या निसर्गाच्या लहरी... त्या सर्वांपेक्षा मला सैन्यातली शिस्त अधिक महत्त्वाची आहे. हे काम पूर्ण करण्याच्या तारखा ठरलेल्या आहेत. तशा चीफ इंजिनीअर आणि आर्मी कोअर कमांडला कळवल्या आहेत. त्या तारखांप्रमाणे त्या सेक्टरमधलं काम पूर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे. आय शॅल सी दॅट इट विल बी डन ! ओ. के. ?''

विश्वनाथ काहीच बोलला नाही. मेजर बंबा एवढं बोलले तरी तो शांतच होता. त्याच्या डोळयांत कुठंही अस्वस्थता नव्हती. त्याच्या मनात काय चाललं आहे याचा कुणालाच अंदाज करता येईना. खोलीत परत विचित्र शांतता पसरली.

मेजर बंबांनी परत विश्वनाथला विचारलं.

''ओ. के. ?''

''नो इट्स नॉट ओ. के.!'' एवढंच बोलून विश्वनाथ थांबला.

'' ठीक आहे. विचार कर आणि पुढच्या शनिवारी मला तुझं उत्तर सांग.''

''माफ करा, पण आज आणि पुढच्या शनिवारमध्ये ह्या रारंग ढांगात सॉईल सर्व्हेच्या दृष्टीने काही फरक पडेल असे मला दिसत नाही. (पृ. ४६)

या संवादातून अधिकारासंबंधीचे मूल्यात्मक प्रश्न उभे राहतात. या अधिकारांचे अवजड ओझे पाठीवर लादून मेजर बंबा वावरतात. त्यामुळे त्यांची फरफट होते. अधिकार हे जर बंबांनी पंखासारखे लावून घेतले असते तर त्या अधिकारांनी त्यांना उंच उंच नेले असते; असे विश्वनाथला वाटून जाते. अधिकारामुळे माणसामाणसात रस्सीखेच होऊन व्यापक हिताकडे दुर्लक्ष होऊन फार मोठे नुकसान होते. या कादंबरीत घडणारा अपघात हा त्याचाच परिणाम असतो. लान्स नाईक सर्जेराव गायकवाड आणि सहा गुरखे यांच्यावर जे छत कोसळते व त्याखाली गाडले जाऊन ते मरतात, ती जागा ठिसूळ असल्याचे आपले मत विश्वनाथने मेजर बंबापाशी व्यक्त केलेले असते. पण त्याचा काहीही उपयोग झालेला नसतो.

विश्वनाथ लष्करात दाखल झाल्यानंतर आपल्या कामाच्या ठिकाणी पोहचत असतानापासून मूल्यांच्या संदर्भात प्रश्न निर्माण करणाऱ्या घटना किंवा प्रसंग घडत जातात आणि विश्वनाथला मुदतपूर्व निवृत्ती दिली

जाते, तोपर्यंत, असे प्रसंग किंवा घटना टिकून राहतात. विश्वनाथ लष्करात दाखल झाल्यानंतर टास्क फोर्सचे कमांडिंग ऑफिसर **कर्नल राइट,** नाइन्थ फिल्ड कंपनीचे कमांडर **मेजर बंबा,** मॅकेनिकल ट्रान्स्पोर्ट कंपनीचा इनचार्ज ऑफिसर **मिनू खंबाटा**, **कॅप्टन नायर, कर्नल बादल, सुभेदार ग्यानचंद** वगैरे व्यक्तींशी विश्वनाथचा जसजसा संबंध येत जातो, तसतशी विश्वनाथची व्यक्तिरेखा ठसठशीत होऊ लागते. कादंबरीकाराने विश्वनाथ मेहेंदळे या कादंबरीगत नायकाचा परिपोष फारच उत्तम केला आहे. विश्वनाथला आदर्श व्यक्तिमत्त्वाचा वारसा त्याच्या वडिलांकडून मिळालेला आहे. तो सौंदर्यप्रेमी आहे म्हणून तो हिमालयातल्या ह्या ढांगाचे संहारक रूप जसे जाणून घेतो; तसा त्यांच्या सौंदर्याकडे आकर्षित होतो. तो निर्व्यसनी आहे. शांत, संयत, गहन विचारी असे त्याचे व्यक्तिमत्त्व आहे. उतावीळपणा कुठेही दिसत नाही. ऐन तारूण्यातला असूनही खूप परिपक्व आहे. कलाप्रेमी असल्यामुळे तो उमाकडे चित्रांच्या माध्यमातून ओढला जात आहे. त्याचे हस्ताक्षर सुंदर आहे. त्याच्या सर्वच सवयी चांगल्या आहेत. रात्री जेवणानंतर त्या प्रशांत वातावरणात तो अर्धाएक तास फिरतो. फिरताना तो मनोमन चिंतनही करीत असतो. कामाच्या बाबतीत त्याचा नीटनेटकेपणा त्याच्या सर्वच अधिकाऱ्यांना पसंत पडलेला आहे. बुद्धिबळ खेळण्यातली त्याची चमक कर्नल राइट यांना भावून गेलेली आहे. कामाच्या संदर्भात तो जे युक्तिवाद करतो, त्यापासून त्याच्या असामान्य बुद्धिमत्तेचे, वैचारिक ठामपणाचे दर्शन घडते. अप्रदर्शनीयता विश्वनाथच्या व्यक्तिमत्त्वात वसलेली असल्यामुळे, विश्वनाथ तिचे प्रदर्शन न करता, कमी बोलून आपल्या सहकाऱ्यांना प्रेम देतो. सर्जेराव गायकवाडबद्दलचं प्रेम हे प्रातिनिधिक स्वरूपाचं आहे. तसेच लॅडस्लाईड आणि त्यात डोक्याला जोराचा फटका बसून जखमी झालेल्या ग्यानचंदला पहायला मेजर बंबा, मिनू, विश्वनाथ डॉक्टर सावरसबरोबर जातात. विश्वनाथ मूकपणे उभा असतो. मेजर बंबा ग्यानचंदशी बोलत असतात. ग्यानचंद विश्वनाथला ओळखून मी बरा होईल ना? असा प्रश्न विचारतो. विश्वनाथचा हात अत्यंत प्रेमाणे घट्टपणे पकडतो. हा प्रसंग विश्वनाथच्या ठायी असणाऱ्या **वात्सल्याचा** जसा निदर्शक आहे, तसा विश्वनाथच्या **नायकत्वाचा** परिपोष करणाराही आहे. अशा छोटया मोठया प्रसंगांतून नायकत्वाचा परिपोष उत्तम केला आहे. मिनू खंबाटासारखी व्यक्ती विश्वनाथला आपल्या मर्मबंधातली ठेव म्हणून जपते; ती यामुळेच!

विश्वनाथ मेहेंदळेंमुळे लष्कर आणि मुलकी क्षेत्रे यासंबंधीचे अनेकविध प्रश्न उपस्थित झाले आहेत. कोर्ट मार्शल झाल्यानंतर कर्नल **कर्तारसिंग बादल** निर्णय देताना, विश्वनाथच्या सद्हेतूंबद्दल कुठेही शंकित होत नाहीत; पण लष्कराची कार्यपद्धती सांभाळून विश्वनाथला दोषमुक्त करतात. माणसांची थडगी उभारली जाऊ

नयेत. रस्ते हे लष्कराच्या दृष्टीने जसे महत्त्वाचे तसे ते सामान्यांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरावेत, हा त्याचा कटाक्ष असतो. ते ज्ञानाचा, सुधारणेचा आणि समाधानाचा प्रवाह बनावेत इतका व्यापक विचार त्याने केलेला असतो. विश्वनाथ मेहेंदळेचे नायकत्व ठसठशीत करणाऱ्या अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील.

या कादंबरीच्या कथानकाची बांधणी अतिशय घट्ट आहे. घटना प्रसंगाची मांडणी करताना मुख्य घटनेला पूरक घटनांची जोड देऊन त्या घटनेद्वारा सूचित होणाऱ्या अनुभवाला गहिरेपणा प्राप्त करून देण्याचे लेखकाचे कौशल्य महत्त्वाचे. अशी उदाहरणे विपुल आहेत. **उदाहरणार्थ :** विश्वनाथला टास्क फोर्स हेडक्वार्टरला कर्नल राइटना भेटून सर्व्हे रिपोर्टस्ची मागणी करायची असते. रविवारच्या सुट्टीचा दिवस असतो. कर्नल राईट या दिवशी कोणालाच भेटत नसतात. पण विश्वनाथला भेट मिळते. विश्वनाथला आपल्या कामाचं स्वरूप स्पष्ट करून घेण्यासाठी सर्व्हे रिपोर्टस् घ्यायचे असतात. सर्व्हे रिपोर्ट्सविना त्याचे काम अडून बसलेले असतात. समोर बुद्धिबळाचा पट. कर्नल राईट एका अवघड चालीत गुंतलेले. हत्तीला वाचवायचे का घोडयाला हा त्यांना प्रश्न पडलेला असतो. दोघेही बुद्धिबळाचा खेळ खेळतात. नंतर विश्वनाथ आपले तेथे जाण्याचे प्रयोजन सांगतो. कर्नल राइट आपली मते मांडून विश्वनाथच्या मतांना निष्प्रभ करतात. बुद्धिबळाच्या खेळातल्या चाली ह्या भाषिक संवादाला पूरक ठरून कलात्मकतेचा प्रत्यय येतो. विश्वनाथ आपले म्हणणे अत्यंत मन:पूर्वक मांडतो. कर्नल राइट बोलत नाहीत. ते आपला विझलेला पाईप पेटवण्यासाठी काडी ओढतात. पाईप चांगला पेटतो तसे ते म्हणतात : मी ऐकतो आहे. बोल तू! पाईप चांगला पेटणे व त्यांचं ऐकणे आणि विचार करणे या घटनांमध्ये आंतरिक अनिर्वचनीय असे नाते आहे. कथा–कादंबरीसारख्या वाङ्मय प्रकारांमध्ये काळाचे सातत्य ठेवणे व अवकाश भरून काढणे यासाठी ह्या घटनांचे महत्त्व असते. कथानकाच्या घटनांच्या गुंफणीला स्वाभाविकता यावी, यासाठी अशा मानवी स्वाभाविक घटनांच्या कडया येत असतात. कादंबरी वाचनात त्यामुळे आस्वाद्यता निर्माण होते.

आणखी एक उदाहरण पाहता येईल. इकडे सर्जेराव गायकवाडच्या अपघाती मृत्यू झालेला असतो. तिकडे हणमंतवाडीला लग्न ठरवून मंडळी तयारीत असते. विश्वनाथने उमाला लग्नाचा अहेर पाठविण्याची व्यवस्था करायला सांगितलेले असते. त्याप्रमाणे उमा तजवीज करते व तसे पत्र पाठवून कळविते. तिने पत्रात लिहिलेले असते "विघ्नहर्त्या गणेशाची सुरेख मूर्ती मिळाली. नववधूबरोबर त्यांचं घर सौख्य व समाधानानं भरलेलं राहो. आणखीनही एक गोष्ट मी पाठविलेली आहे. शिंपल्याचा एक छानसा कुंकवानं भरलेला करंडा!

माझ्याकडून पार्वतीला तिच्या शुभ विवाहाची भेट.'' पत्रातील मजकूर आणि प्रत्यक्ष सर्जेरावबाबतीत घडलेली घटना यांचा संबंध हा विरोधी आहे.

उमाचे पत्र वाचून झाल्यावर विश्वनाथच्या डोळयांसमोर सर्जेरावची वाग्दत्त वधू उभी राहते.

''फोटोत पाहिलेली, डोक्यावर पदर घेतलेली, सतरा – आठरा वर्षांची पार्वती विश्वनाथच्या नजरेसमोर उभी राहिली. हसरा चेहरा आणि कपाळावर मोठं कुंकू!'' कादंबरीत पुढे वाक्य येतं – ''दिव्यातलं तेल संपत आलं असावं. ज्योत फडफडत होती. विश्वनाथनं वात वर सरकवली.'' सर्जेरावच्या अपघाती मृत्यूचं सूचन ह्या अशा संकेतात्मक वर्णनांनी करून सबंध प्रसंगाला दु:खाचे एक गडद गहिरे परिणाम दिले आहे. कादंबरीत लेखक योगायोगाच्या घटनाही वापरतो. त्या कधी संवादी तर कधी विरोधी म्हणूनही येतात. विश्वनाथची डिटॅचमेंट थ्री मधून फील्ड कं. नं. ५ ला बदली होते. त्या उद्विग्न अवस्थेत विश्वनाथच्या वडिलांचं धीरोदात्तपणाचं उपदेश करणारे पत्र येते. या घटना संवादी म्हणता येतील.

**'रारंग ढांग' या कादंबरीतील व्यक्तिचित्रण :**

या कादंबरीतील विश्वनाथ मेहेंदळे, मेजर बंबा, मिनू खंबाटा, बहादूर अशी सगळी माणसं आपापल्या तत्त्वांशी, मूळ स्वभावाशी बांधली गेलेली आहेत. त्यांचे जिवंत चित्रण लेखकाने उभे केले आहे.

**विश्वनाथ मेहेंदळे :**

विश्वनाथ मेहेंदळे हे या कादंबरीचे नायक. मध्यम उंची, गौर वर्ण, कपाळावर आलेले बेफिकीर केस, निर्भय, बोलके डोळे असे विश्वनाथ मेहेंदळे यांचे व्यक्तित्व होते. मुंबईमध्ये चांगली नोकरी असणारा विश्वास मेहेंदळे हा मराठी तरूण मुंबईतील नोकरी सोडून हिमालयात रस्ते बांधणीच्या कामासाठी येतो. त्याचे व्यक्तिमत्त्व स्वप्नाळूही आहे आणि धीरगंभीरही आहे. तो कमालीचा विचारी असून अंतर्मुखही होणारा आहे. त्याची जी अनामिक जिद्द आहे, ही जिद्द घेऊनच तो सदैव सरहद्दीवर वावरतो. तो माणसाच्या अंत:करणातील अंतरात्मा जाणणारा आहे. हळवा, धीरगंभीर आणि खंबीर व्यक्तिमत्त्वाचा हा विश्वनाथ आपल्यातील हळवेपण जितके जपतो तेवढाच धीरगंभीरपणे वावरतो. त्याच्यातील चिवटपणा त्याच्या प्रत्येक कृतीतून आपल्या प्रत्यायाला येताना त्याच्यातील विचारीपणाचाही कुठे विसर पडत नाही.

हिमालयाच्या निसर्गरम्य पर्वतरांगांमध्ये वावरताना विश्वनाथला ह्या परिसराचं दुरून न दिसणारं पण वास्तव असं भयानक संहारक रूप जाणवतं. तो हिमालयाचा परिसर आत्मसात करीत राहतो. निसर्ग आणि



HRMMARATHISDS

माणसे समजावून घेण्याची त्याला जिज्ञासा आहे. इथला चार्ज घेण्यापूर्वी विश्वनाथ मुंबईतील युनायटेड कन्स्ट्रक्शनमध्ये कामाला होता. एवढी मोठी कंपनी सोडून तो बॉर्डर लाइनवर कामासाठी येतो, हे व्यवहार्य अजिबात नाही. कारण आधीच्या कंपनीएवढा पगार आणि सुविधा त्याला येथे मिळणार नाहीत; याचीही त्याला कल्पना आहे. तरीही हिमालयात रस्ते बांधणीची त्याची इच्छा आहे. कारण इथल्या लोकांना या रस्त्याचा उपयोग होईल आणि बाहेरच्या जगाशी त्यांचे संबंध येतील; ही त्याची धारणा आहे.

आपल्या विचारांशी प्रमाणिक राहण्याचं धैर्य लेफ्टनंट विश्वनाथ मेहेंदळेजवळ आहे. त्यामुळे तो निव्वळ व्यवहारी नाही. जे स्वत:ला पटलेलं आहे त्या गोष्टींसाठी सर्वस्व झुगारून देण्याची जिद्द त्याच्याजवळ आहे. ह्या जिद्दीतूनच तो रारंग ढांग म्हणून रस्ता बांधणीचे काम हाती घेतो. जमिनीपासून नऊ हजार फूट उंचीवर रस्ते बांधण्याचं हे अजब काम तो करीत राहतो. जिथे त्यांचं हे काम सुरू आहे, तिथं दुरून रम्य पण जवळून भयानक असणारं मृत्यूचं रूप सदैव त्याच्या सोबत आहे. त्याच्या मनात विचार येतात; इथं मृत्यूच्याहाती सापडलेल्या देहाच्या अस्थीदेखील हाती लागायच्या नाहीत. मग शेवटी काय उरतं?

विश्वनाथ हळूहळू त्या परिसराचाच होतो. तिथल्या निसर्गाची त्याला सवय होते. तिथल्या माणसांना रोज कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे, हे तो पाहतो. इथल्या मेंढपाळांना निसरडया पूलावरून एकेक बकरी उचलून न्यावी लागते. ते पाहून त्याच्या मनात असा विचार येतो की, आपल्या देशात माणसाच्या वेळेला 'किंमत' नाही आणि त्यापलीकडं त्याच्या जीवनालाही.

हा संपूर्ण दुर्गम परिसर रस्ते बांधल्याशिवाय सुगम होणार नाही; या भावनेतून विश्वनाथ 'रारंग ढांगा'शी एकरूप होऊन रस्ता बांधणीचे काम करतो. हे करीत असताना निसर्गाचं शत्रूहूनही भयंकर रूप तो साक्षात अनुभवतो. पण त्याच्याजवळ असणाऱ्या इच्छाशक्तीच्या बळावर तो अडचणींवर मात करीत राहतो. हिमालयात कोसळणाऱ्या दरडी, यामुळे होणारे अपघात; यावर काही उपाय सापडेल का? या विचाराने तो कार्यमग्न होतो.

रोज घडणारे छोटे मोठे अपघात, मरणारी माणसे तो पाहतो. इथली परिस्थिती रणांगणापेक्षा भयंकर असते. निसर्गच शत्रू होऊन संहारासाठी सदैव सज्ज असतो. अशा परिस्थितीत आपल्या कामाचा फायदा समाजाला झाला पाहिजे, अशी धारणा असलेला हा नायक आपले काम निष्ठेने करीत राहतो. विश्वनाथ याचे आपल्या कामावर उत्कट प्रेम असते. तो 'उमा' नावाच्या एका युवतीच्याही प्रेमात पडला आहे. तो तिला पत्रेही लिहितो. पण त्याची निष्ठा उमावरील प्रेमापेक्षाही कामावरील प्रेमावर अधिक आहे. विश्वनाथ केवळ स्वत:च्या

सुखाचा विचार करनारा नाही. त्यामुळे कधी कधी वडील आणि उमा यांच्याबाबत भावूकही होतो; मात्र या भावूकतेत वाहून जात नाही. त्यानं वडिलांना आणि उमाला लिहिलेली पत्रे त्याच्या भावूकतेची साक्ष देतात. तरीही तो बॉर्डर लाईनवर वावरताना उमाच्या प्रेमापेक्षाही कर्तव्यतत्परतेने श्रमाचा महिमा गात राहतो.

रारंग ढांगात काम करीत असताना लोकांच्या सुरक्षिततेला महत्त्व द्यायचं की लष्कराच्या शिस्तीला? तत्त्वांसाठी प्रामाणिक राहायचे की भौतिक सुखासाठी लागणाऱ्या गोष्टी निष्ठेने पार पाडत राहायच्या हे त्याला कळत नाही. इतरांच्या सुखाआड न येणाऱ्या आणि स्वत:ला पटणाऱ्या कामांमध्ये गुंतून जाणे हा काय मोठा गुन्हा आहे का? विश्वनाथचा हा सवाल फार बोचरा आहे.

असा हा विश्वनाथ अहोरात्र कामावर निष्ठा ठेवून 'रारंग ढांगा'तील रस्त्याचं काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो, परंतु घडतं मात्र निराळंच. सरकारी मालमत्तेची अफरातफर आणि स्वत:च्या अधिकारांचा गैरवापर ह्या आरोपांवरून विश्वनाथला अटक होते. त्याला कोर्ट मार्शला सामोरं जावं लागतं. ज्या विश्वनाथच्या तनामनात 'रारंग ढांग' भिनलेला असतो त्या विश्वनाथला आपल्या अंगावरील लष्करी गणवेश उतरवणं क्लेशदायक होतं. तो त्या स्थितीत 'रारंग ढांगा'ला सलाम करतो.

ह्या कादंबरीमध्ये प्रभाकर पेंढारकरांनी विश्वनाथ मेहेंदळेसारख्याच कर्मनिष्ठ माणसाला व्यावहारिक पातळीवर कशाप्रकारे नैतिक पराभव पत्करावा लागतो. याची तात्त्विक मीमांसा अत्यंत समर्पकपणे केली आहे.

**मेजर बंबा :**

'रारंग ढांग' कादंबरीतील सर्वच माणसे आपापल्या तत्त्वांशी, विचारांशी बांधलेली आहेत. त्यातले एक म्हणजे मेजर बंबा. हे अत्यंत धाडसी, बेदरकार अधिकारी. त्यांचा गाडीवरचा ताबा विलक्षण होता. त्यांच्यातला आत्मविश्वासही जबर होता. म्हणजे एखादी गोष्ट करायला फार अवघड आहे हे कळलं की ती गोष्ट काहीही करून पार पाडण्यात त्यांना फार भूषणं वाटतं आणि नेहमी ते अशी गोष्ट पूर्ण करण्याला ते प्राथमिकता देतात. मेजर बंबा याचं मत सिव्हिलियन इंजिनिअरर्सबद्दल चांगलं नसल्याने संपूर्ण कादंबरीभर विश्वनाथ मेहंदळे यांचा राग – राग करताना दिसतात. त्यांच्या मते सिव्हिलियन इंजिनिअरपेक्षा मिलिटरी इंजिनिअर्समध्ये शिस्त आणि मनाचा व शरीराचा कणखरपणा अधिक असतो. शेवटी तर विश्वनाथ यांच्यावर ते कोर्ट मार्शल करतात.

**मिनू खंबाटा :**

टापटीप राहण्याला प्राधान्य देणारा मिनू खंबाटा हा अधिकारी दिवसभर काम केल्यानंतर घरी खोलीवर आल्यानंतर अनेक सोंदर्यवतींच्या फोटोमध्ये गुंतून जातो. आणि कुठल्याही प्रकारे का असेना आयुष्य अगदी रसरसून जगणं त्यांना महत्त्वाचं वाटतं. जीवनाचा आनंद घ्यावा, सर्वांना तो वाटावा, कुणाच्यातरी चेहऱ्यावर फुललेलं स्मित पासून खूश होऊन जावं. बागेत फुलांचे ताटवे लावावेत तशी जावं तिथं स्मित फुलवावी, हे मिनू खंबाटा यांच्या जीवनाचं तत्त्वज्ञानं! विश्वनाथबद्दल ते विशेष सहानुभूती बाळगून असतात. कोर्ट मार्शलच्या वेळी ते विश्वनाथच्या बरोबर असतात.

**बहादूर :**

रस्ता बांधणीच्या कामासाठी लोकल लेबर व तिबेटी कामगार यांचा मुखिया असलेला बहादूर नावाचा व्यक्ती या कादंबरीत येतो. या मजुरांची जबाबदारी शब्दश: प्राणापलिकडे जपतो. जबाबदारी पेलून धरतो. मात्र एका टप्प्यावर रारंग ढांगातील अपघातात बहादूर यांच्या बरोबरच्या काही कामगारांचा मृत्यू होतो. यामुळे बहादूर कोलमडून जातो. गावी गेल्यावर त्या कामगारांच्या बायका मुलांना कसं तोंड दाखवू? असा प्रश्न विश्वनाथला विचारतो. माझ्या भरवशावर ते कामगार इथं आले होते. ती गेली आणि त्यांचा सरदार तेवढा मागे राहिला ! हे सांगताना त्याचा गळा दाटून येतो. त्याच रात्री तो सतलजमध्ये उडी मारून स्वत:ला संपवतो.

**ग्यानचंद :**

विश्वनाथ पहिल्यांदा कामावर रूजू व्हायला आला, तेव्हा त्याला न्यायला ग्यानचंद नावाचा ड्रायव्हर जीप घेऊन येतो. हिमालयाकडे जाताना वाटेत तो विश्वनाथला प्रश्न विचारतो, 'साब एक बात बताऊँ, आदमी मर जाता है तो क्या रह जाता है? विश्वनाथ विचार करायला लागल्यावर तोच उत्तर देतो, 'यादगारी' तो विश्वनाथला अनेक चौथरे दाखवतो. त्यावर सफेद अक्षरात अनेक शहीद लष्करी जवानांची नावे कोरलेली असतात. ग्यानचंदला दरड कोसळण्यात डोक्याला जबर मार लागतो. तो स्वत:चा जीवंतपणीच चौथरा उभारतो.

**निसर्ग :**

निसर्ग हे ही एक पात्र म्हणून या कादंबरीत येते. उदा. सतलज नदी. विश्वनाथ जेव्हा कामावर रूजू होतो; तेव्हा त्याला पांढरे तुषार उडवत, दूरवर, ध्रोंकार करत खळखळ वाहणारी सतलज नदी दिसते. कामात अखंड बुडून गेल्यानंतर एकाकी वातावरणात रात्री स्वत:शी गुणगुणत एखाद्या अभिसारेसारखी त्याला सतलज नदी वाटते. रस्ता बांधणीचे काम करताना गर्डरवरून हाताची पकड आता सुटत चाललीय आणि दिसणारी



HRM MARATHI SDS

सतलज नदी. आता सतलजमध्ये कोसळणार असाही एक क्षण येतो तेव्हा हीच सतलज त्याला भासलेली भयावह दुर्गा अशी अनेक रूपे निसर्गाची लेखक व्यक्त करतो.

याशिवाय मेजर नायर, कर्नल राईट, सर्जेराव गायकवाड ही इतर काही पात्रे या कादंबरीत येतात. या सर्व पात्रांचे स्वभाव, निसर्ग यांचा आपल्या मनावर प्रभाव पडतो. ही सर्व पात्रे स्वत:च्या तत्त्वांशी घट्ट का आहेत? तर त्यांची मृत्यूशी फार जवळीक आहे. मृत्यू त्यांच्या पावला पावलासमोर उभा आहे. यामुळे स्वत:शी प्रामाणिक राहणं; ही तिथल्या माणसांची अंगभूत उर्मी बनली आहे.

उत्तुंग आणि बलाढय रारंग ढांगाशी झुंजणारी ही माणसं आपल्या आतही एक अडींग ढांग घेऊन वावरतात. आपल्या या तत्त्वांचा, प्रतिमेचा, उद्दिष्टांचा, आपल्यातही मन – विचाराच्या छटा त्यात दिसतात.

**'रारंग ढांग' मधील चिंतनशील विचारसरणी :**

'रारंग ढांग' ही जरी व्यक्तिकेंद्रित कादंबरी असली आणि कादंबरीचे संपूर्ण कथानक 'रारंग ढांगा'तील रस्ता व लेफ्टनंट विश्ननाथ मेंहेंदळे यांच्याभोवती फिरत असेल तरीदेखील कादंबरीत इतरही ज्या व्यक्तिरेखा आणि लेफ्टनंट विश्ननाथ मेंहेंदळे ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा यांच्या अभिव्यक्तीतून जे जीवनचिंतनपर विचार व्यक्त झाले आहेत त्यातून लेखकाचा चिंतनशील दृष्टिकोन पदोपदी व्यक्त होतो. संपूर्ण कादंबरीमध्ये मानवी जीवन आणि मानवी अस्तित्व याविषयी अनेक महत्त्वपूर्ण विचार येतात.

'पृथ्वीतलावर जे जे काही उपभोगण्यासारखं आहे ते अनुभवण्यासाठीच परमेश्वरानं आपल्याला जन्माला घातलं आहे.' (पृष्ठ ८)

'आपल्या देशात माणसाच्या वेळेला किंमत नाही आणि त्यापलिकडे त्याच्या जीवनालाही.' (पृष्ठ १९)

'जब आदमी मर जाता है तो उसका क्या रहता है? बस, एक चबुतरा और उसपर सफेद अक्षरोंमे उसका नाम।' (पृष्ठ ३, ८, ३०, ११४, १३१, १४८)

'आयुष्यात कितीतरी गोष्टी काल केल्या नव्हत्या एवढंच कारण त्या आज ना करायला पुरेसं नसतं.' (पृष्ठ ३५)

'आकाशाला भिडणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची माणसं आपल्या मोठेपणाचं जाहीर प्रदर्शन मांडत नाहीत. जाडयाभरडया कपडयाआड त्यांची मनाची श्रीमंती शालीनतेनं लपलेली असते आणि दारिद्रय व उपेक्षा ह्यांना पेलूनही त्यांची मान ताठच असते.' (पृष्ठ ३७)

'अधिकार हे माणसाला पंखासारखे उंच घेऊन जाणारे असावेत.' (पृष्ठ ४७)

'फोटो कितीही सुरेख असला तरी तो केवळ त्या क्षणाच दृश्य रूप पकडतो. पण कलाकाराचा कुंचला त्यापलिकडं जातो. असं चित्र हे केवळ त्या वस्तूचं दृश्य रूप राहत नाही, तर कलावंताच्या मनाचंही त्यात प्रतिबिंब दिसू लागतं. (पृष्ठ ४९)

'हृदयाच्या गाभाऱ्यातून निर्माण झालेली प्रत्येक इच्छा पूर्ण थोडीच होते? ती न व्हावी यातच सोंदर्य आहे.' (पृष्ठ ५०)

'सैनिकानं लढणं हे जितकं महत्त्वाचं तितकचं त्यानं विजय मिळविणं, दिलेली कामगिरी पूर्ण करणं, हेही.' (पृष्ठ ५५)

'शिस्त माणसासाठी असावी. त्या शिस्तीच्या नावाखाली माणूस भरडून त्याचं मशीन न व्हावं.'

(पृष्ठ ६५)

'थकव्यासारखी उशी नाही. श्रमासारखी गादी नाही. दमलेल्या, श्रमलेल्या माणसांची झोप किती गाढ असते. कसली हालचाल नाही की अस्वस्थ तळमळ नाही. ही निद्रा त्यांच्याभोवती हलकेच एक गहिरं आवरण निर्माण करत.' (पृष्ठ ८०)

'जगात आधुनिक विज्ञानानं अनेक शोध लावले पण आपल्याला हवी ती स्वप्नं पाहण्याचं साधन अद्याप बाजारात विक्रीला आलेलं नाही.' (पृष्ठ ८१)

'सत्तेची जाणीव किती विलक्षण असते. आपल्या शब्दाला लोक घाबरतात. तत्परतेनं मान तुकवतात. तसं ते न करतील तर त्यांना जीवनातून उठवण्याची शक्ती आपल्या हाती आहे.' (पृष्ठ ८१)

'रस्ता म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर नव्हे. ह्या उंचसखल परिसरावर मारलेली ती एक फक्त रेघ नव्हे. सैन्याच्या वाहतुकीची केवळ एक सोय नव्हे. रस्ता ही त्या विभागातल्या आजवर उपेक्षिल्या गेलेल्या लोकांना सुधारणांशी जोडणारी एक साखळी आहे. प्रगत विज्ञानानं माणसाला जे दिलं आहे ते इथल्या लोकांच्यापर्यंत पोहोचणारं ते एक साधन आहे. रस्त्यानं माणसाच्याबरोबर त्यांचे विस्तार प्रवास करतात. आशा आणि आकांक्षा, शिक्षण आणि ज्ञानही.' (पृष्ठ ८२)

'मी कोण?' हा विश्वातला सगळयात गहन प्रश्न.' (पृष्ठ ९२)

'पूर्वी माणसं गुलाम म्हणून लिलावात एका रकमेत विकत घेतली जात. आता ही सुधारणा आहे काय की ती महिन्याच्या हप्त्यावर विकत घेता येतात.' (पृष्ठ ९५)

'कधी बुलडोझरदेखील एखाद्या अप्सरेसारखा सुंदर वाटतो तसंच एखाद्या अविस्मरणीय कलाकृतीसारखाच हा रस्तादेखील निर्मितीचा आनंद देतो.' (पृष्ठ १२२)

'विजयाच्या पितृत्त्वावर हक्क सांगण्यासाठी अनेक जण पुढं येतात, पण पराभव हा नेहमीच पोरका असतो. शत्रूकडून हार खाणारा सैनिक त्याच्या देशाकडूनही उपेक्षिला जातो. विजयात भागीदार अनेक असले तरी पराभवाची अवहेलना, अपमान आणि तुच्छता ज्याची त्यालाच पचवायला लागते. (पृष्ठ १३४)

'मृत्यूइतकंच जीवनही शाश्वत असतं. विध्वंस, संहार ह्यांतून माणसाची जिद्द जीवनाला फिरून आकार देत असते.' (पृष्ठ १६७)

'ह्या जगात सर्वसुखी माणसाइतकाच स्वतंत्र माणूसही दुर्मिळ आहे काय?' (पृष्ठ १६८)

या विचारांतून लेखकाची चिंतनशील विचारसरणी स्पष्ट होते. किंबहुना मानवी जीवन आणि मानवी अस्तित्व याविषयी लेखक जेव्हा भाष्य करतो, तेव्हा नुसते शब्दांचे फुलोरे फुलवत नाही तर त्या विचारांची तात्त्विक मीमांसा आणि चिकित्सा करतो. जीवनाचा उपभोग, जीवन साजरे कसे करावे, मानवी आयुष्य, मानवी जीवन आणि मानवी अस्तित्वाचा अर्थ, मानवी जीवनातील अहंकार, नम्रता, शालीनता ह्या बाबींचे महत्त्व, अधिकारी आणि अधिकारांचा यथोचित अर्थ, कला आणि कलाकृती याविषयीचे चिंतन, आशा, आकांक्षा यांची अपूर्णता म्हणजे काय? यंत्र आणि माणूस यातील फरक, मानवी जीवनातील निद्रासुख, माणसाची स्वप्नं, सत्ता आणि सत्ताधिशांचे स्वभावधर्म, रस्ता आणि रस्त्याविषयीचे चिंतन, 'स्व'चे अस्तित्व, बौद्धिक आणि शारीरिक गुलामी, जय – पराजय, जगणं आणि मरणं, सुख – स्वातंत्र्य अशा कितीतरी बाबींविषयी अत्यंत नेमकेपणाने चिंतन ह्या कादंबरीत आले आहे. त्यामुळे कादंबरीला एक प्रकारचा तात्त्विक अनुबंधही प्राप्त झाला आहे.

ही कादंबरी ज्या ज्या जीवनमूल्यांची चर्चा करते, त्या जीवनमूल्यांविषयी यथोचित भाष्य करून जाते. सरहद्दीवरील सैनिकी जीवन काय किंवा एकंदरीत ह्या देशातील माणसाचे जीवन काय? ह्या व्यवस्थेचीच मूल्यव्यवस्था मांडण्याचे कार्य वर उद्धृत केलेली कादंबरीतील अवतरणे करतात. ही अवतरणे नायकाचा जीवनविषयक दृष्टिकोन स्पष्ट करतात. हा दृष्टिकोन व्यक्त होतो तो कादंबरीमध्ये ज्या काही घटना घडतात त्या

घटनांच्या अनुशंगाने. एखाद्या बाबीवर भाष्य करण्यासाठी लेखकाने कोठेही आणि कसलीही ओढाताण केलेली नाही. अत्यंत स्वाभाविकपणे केलेली ही जीवनचिंतने नायकाचे विचार व भावनांवर जीवनभाष्ये करतात.

सहाजिकच 'रारंग ढांग' केवळ सरहद्दीवरील परिस्थितीपुरती मर्यादित राहत नाही. तर एकंदरीत मानवी जीवनातील ज्या विविध भावभावना आहेत त्या भावभावनांना ही कांदबरी व्यापते. जीवनात कोण कोणत्या मूल्यांना, कोणत्या पातळीवर, कसे आणि कितपत मूल्य देते याचे नितांत सुंदर चिंतन ही कादंबरी करते. त्यामुळे सरहद्दीवरील धैर्याची आणि शौर्याची मर्यादा ओलांडून ती बहुपदरी बनते. जीवनातील अनेक स्तर आणि स्थित्यंतरे ती साकारते.

मानवी जीवनातील मानवी संबंधाचा जो गुंता आहे त्यावरही ही कादंबरी भाष्य करते. शेवटी तर एक महत्त्वाचे तत्त्वज्ञान ही कादंबरी सांगते. माणूस हा एकटा असतो. समाजव्यवस्था, राजवटी, अधिकार, अधिकारी, मित्र, सोबती ह्या साऱ्यांचे अस्तित्व हे शेवटी यादगारीत लोटले जाते. शेवटी माणूस जिवंत असला आणि नसला तरी त्याच्या संदर्भात एकच गोष्ट पूर्णसत्य ठरते; ती म्हणजे त्याचे एकटेपण. तो मेला तर माणसे त्याच्या आठवणीशिवाय काहीही काढत नाहीत आणि त्याला स्वत:लादेखील वर्तमान जीवनात येतात त्याने केलेल्या भल्याबुऱ्या आठवणीच.

**'रारंग ढांग' या कादंबरीतील अनुभवसृष्टी :**

ह्या कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये लेखकाच्या प्रतिभेबरोबर त्यांची जी अनुभवसृष्टी आहे आणि प्रत्यक्ष सरहद्दीवर त्याने अनुभवलेले निसर्गाचे वातावरण आणि त्या वातावरणामध्ये वावरणाऱ्या माणसांच्या समस्या यांचे निरीक्षण अधिक उपयुक्त ठरते. सर्वसाधारण कलाकृतीमंध्ये कलानुभवावर जे प्रतिभेचे कलम होऊन लेखकाच्या कल्पनाशक्तीच्या पालवीचा जो बहर येतो तो बहर 'रारंग ढांग' मध्ये फारसा नाही. येथे जे काही आहेत ते प्रत्यक्ष अनुभव आहेत. हिमालय चित्रात पाहणाऱ्याला हिमालयाचे सोंदर्य लोभसवाणे वाटेल पण जो हिमालयात वावरला आहे, त्याला त्या लोभसवाण्या सोंदर्याच्या प्रतितीबरोबरच हिमालयाच्या अंतरंगातील ज्या नाना कळा आहेत, त्या कळांचे ही प्रत्यंतर आल्याशिवाय राहत नाही. लेखकाने सरहद्दीवर त्या बिकट निसर्गाचा आणि त्या बिकट परिस्थितीत रस्ते बांधणीचे काम करीत असताना येणाऱ्या अडचणींचा साक्षात अनुभव घेतलेला असल्यामुळे ह्या कादंबरीचे स्वरूप नवनिर्मितीपेक्षाही दृश्यवर्णनाचेच आहे. येथे लेखकाच्या कल्पनाशक्तीला वाव कमी आणि प्रत्यक्ष पाहिलेल्या वास्तव चित्रणावर अधिक भर आहे.

**'ररंग ढांग' या कादंबरीतील निवेदनशैली :**

कादंबरीमध्ये व्यक्तिरेखांना जिवंतपणा आलेला आहे. लेखकाच्या प्रत्यक्ष त्या व्यक्तींच्या वागण्याच्या आणि बारीकसारीक तपशिलांच्या निरीक्षणातून हा जिवंतपणा आलेला आहे. बॉर्डर रोडवर अनुबोधपट निर्माण करण्याच्या निमित्ताने लेखकाला हा अनुभव मिळाला. ह्या परिसराशी आणि परिसरातील माणसांशी, वातावरणाशी त्यांचा निकटचा संबंध आला. त्यामुळेच लेखकाला 'ररंग ढांग' ही कादंबरी लिहिणे शक्य झाले आहे. अत्यंत चित्रमय शैलीतील कादंबरीची निवेदनशैली आपल्या समोर सरहद्दीवरील वातावरण तिथल्या समस्यांसह उभी करते. लेखकाने प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे आधी कादंबरीची निवेदनशैली आत्मनिवेदनपरच होती. परंतु आत्मनिवेदनाऐवजी त्रयस्ताच्या दृष्टिकोनातून ही कादंबरी लिहावी या प्रकाशकांच्या सूचनेप्रमाणे पुन्हा ती बदलून लेखकाने तृतीयपुरूषी कांदबरी लेखन केले आहे. कादंबरीत 'मी' च्या ऐवजी 'तो' असा बदल झाला आहे.

**'ररंग ढांग' या कादंबरीतील संघर्ष :**

'ररंग' नावाच्या एका ढांगावर रस्ता बांधण्यासाठी विश्वनाथ मेहेंदळे नावाचा मुलकी अधिकारी (सिव्हिलीयन ऑफिसर) नियुक्त केला जातो. त्याला रस्ता बांधताना काय काय अडचणी आल्या; याची ही कथा आहे. खरं तर वरवर आपल्याला अशी कथा वाटत असली तरी या गोष्टीच्या आतही एक गोष्ट आहे; त्याचा शोध घेणं महत्त्वाचं आहे. तो एक स्वतःच्या तत्त्वांशी चाललेला संघर्ष आहे. तसा तो निसर्गाशी चाललेला संघर्ष आहे; तसाच तो माणसामाणसात चाललेला संघर्ष आहे. हा संघर्ष अनेक पातळयांवर चालताना दिसतो.

दुर्गम पहाडी भागात होणारे रस्ते बांधणीचे काम अत्यंत प्रतिकूल हवामानात चालते. येथे निसर्ग शत्रूच्या रूपात असतो. क्षणात होत्याचे नव्हते होते. निसर्ग आणि माणूस यांची रस्सीखेच जशी या कादंबरीत येते तशी माणसामाणसातील रस्सीखेच दिसून येते. विश्वनाथ हा हुशार, महत्त्वाकांक्षी, चुनचुनीत तरूण सिव्हीलीयन ऑफिसर असतो. तो कामाच्या गुणवत्तेला जास्त महत्त्व देतो; त्याच वेळेत त्याच्या बरोबरचे सहकारी काम वेळेत, ठरलेल्या पद्धतीने, शिस्तीत पूर्ण व्हायला महत्त्व देतात. खरं तर दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या. कुठल्या गोष्टीला जास्त महत्त्व द्यायचे यातून उद्भवलेला हा संघर्ष आहे. हा माणसामाणसातील तात्त्विक संघर्ष आहे. लोकांच्या सुरखिततेला महत्त्व द्यायचे की लष्कराच्या शिस्तीला? आपल्या स्वतःच्या तत्त्वांशी प्रामाणिक राहायचं की भौतिक सुखासाठी लागणाऱ्या गोष्टींना पार पाडत राहायचे? हे विश्वनाथ समोर मोठं आव्हान आहे.

'इतरांच्या सुखाआड न येणाऱ्या आणि स्वत:ला पूर्णपणे पटलेल्या अशाच कामांमध्ये गुंतून जाणे हा फार मोठा गुन्हा आहे का? हा विश्वनाथचा सवाल बोचरा आहे. या कादंबरीत विश्वनाथचा स्वत:शी, सहकारी अधिकाऱ्यांशी आणि निसर्गाशी सतत संघर्ष चाललेला दिसतो.

**'रारंग ढांग' या कादंबरीची भाषा :**

'रारंग ढांग' या कादंबरीची भाषा अत्यंत प्रौढ आणि प्रगल्भ आहे. वर्णनाच्या वेळी सौष्ठवयुक्त संवादांमधून युक्तिवादांचे दर्शन घडविणारी भाषा आहे. कादंबरीत विविध विषयांवर भाष्ये प्रस्तुत करताना रूपकात्मक, तत्त्वज्ञानप्रचुर अशी विविध रूपे करणारीही आहे. एखादा उतारा उदाहरण म्हणून पाहता येईल.

''विश्वनाथनं वळून पाहिलं. गाडीतून मागं रारंग ढांग अजून दिसत होता... पहिल्यांदा पाहिला तसाच आताही रारंग ढांग बलदंड आहे. आकाशाला मस्तक भिडवून स्वत:च्या मस्तीत हरवलेला आहे. पण आता त्याच्या अंगावर एक लहानशी रेषा असते. जी लहानशी रेषा माणसाच्या जिद्दीचं प्रतीक आहे. ह्या रेषेवरून आता वाहनं धावू लागतील. मृत्यूच्या जबडयातून जीवनाची रहदारी चालू राहील आणि त्याला साक्षी राहतील त्या आठ यादगारी!''

परतताना विश्वनाथ कर्नल राईटना भेटतो. कर्नल राइट विश्वनाथसारख्या ध्येयवादी तरूणाची अगतिकता ही आपल्या देशाच्या विविध क्षेत्रांच्या व्यवस्थेतच कशी दडलेली आहे हे स्पष्ट करताना म्हणतात की : ''जे काम करायचं ते तुला (विश्वनाथला) पटलं पाहिजे! (असं तुला वाटतं) केवळ इंजिनीअरलाच दिलेल्या प्लॅनप्रमाणे इमारती किंवा रस्ते बांधावे लागतात असे नाही. ज्याचा जीवनाशी संबंध नाही आणि जे मनापासून पटलेलं नाही ते विद्यार्थ्यांना शिकवण्याची पाळी शिक्षकावर येते. राज्यकर्त्यांच्या लहरीनुसार संशोधनाचे विषय शास्त्रज्ञांना निवडावे लागतात. फार काय, राज्यकर्त्या मंत्र्यांनाही देशहितापेक्षा आपल्याला मत देणाऱ्यांना खूष ठेवण्याकडे अधिक लक्ष द्यावं लागतं. सैन्यात नसेल पण बाहेर तरी तुला अपेक्षित असलेलं स्वातंत्र्य आहे का?'' कर्नल राइटसह सर्वच लष्करी अधिकाऱ्यांची अगतिकता त्यांनी बोलून दाखविली आहे आणि कादंबरीगत मूल्यांच्या झगडयाचा अंतिम निकाल लावला आहे.

तपशिलाच्या बाबतीत अत्यंत काटेकोर असलेली, घटनाप्रसंग चित्रमय पद्धतीने जागृत करणारी मूल्यात्मक प्रश्नांना साहसाच्या कोंदणात बसवून, मानवी कर्तृत्वाचे परिस्थितीनिष्ठ भागधेय ठरविणारी अशी ही सुश्लिष्ट कादंबरी आहे.

**'रारंग ढांग' या कादंबरीचे शीर्षक :**

'रारंग ढांग' या कादंबरीचे शीर्षक यथोचित आहे. भारत तिबेट सीमा म्हणजेच आताची भारत चीन सीमारेषा ज्या भागातून जाते; त्या भागातील सतलज नदीच्या दोन्ही बाजूंनी असलेल्या उंच अशा डोंगरांना तेथे 'ढांग' असे म्हणतात. 'ढांग' म्हणजे हिमालयातील नितळ उभे कडे. जे हजारो फूट उंचीचे असतात. त्यातलाच एक हा रारंग ढांग आहे. हिमालयाची प्रचंड उंची, ऑक्शिजनचे विरळ प्रमाण, कडाक्याची थंडी, हिवाळयात साठणारे बर्फ, वारंवार होणाऱ्या अकल्पित लॅडस्लाईडस (दरड कोसळणे), यामुळे येथे काम करणाऱ्या माणसांना फार साहसपूर्ण आयुष्य जगावे लागते. या कादंबरीचा विषय साहसप्रधान आहे. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन ही संस्था हिमालयात अतिशय उंचावर रस्ते बांधते. जगात कुठेही न घडणारी अशी घटना म्हणता येईल. त्याचाच एक भाग म्हणून हिमालय पर्वताच्या उभ्या कडयामधून रस्ता काढण्याचा साहसपूर्ण अनुभव हा या कादंबरीचा मुख्य विषय आहे. या पार्श्वभूमीवर 'रारंग ढांग' हे या कादंबरीचे शीर्षक अत्यंत समर्पक असे आहे.

**सारांश :**

'रारंग ढांग' ही प्रभाकर पेंढारकर यांची अत्यंत गाजलेली कादंबरी. ही कादंबरी हिमालयातील पर्वतरागांमधील आहे. हिमालयातील डोंगरांना, कडयांना, उंच सुळख्यांना त्या भागातील बोलीभाषेत ढांग म्हणतात. हिमालयातील भारत तिबेट सिमेवर असलेला 'रारंग ढांग' हा एक असाच उत्तुंग सरळसोट कडा. या 'रारंग ढांगा'वर रस्ता बांधणीसाठी विश्वनाथ मेहेंदळे नावाचा मुलकी इंजिनियर असलेला ध्येयवादी माणूस अनामिक ईर्षा बाळगून परिस्थितीशी झुंज देत राहतो; पण त्याचा अंती नैतिक पराभव कसा होतो, याचे चित्रण ह्या कादंबरीत लेखक प्रभाकर पेढांरकर यांनी अत्यंत समर्पकपणे केले आहे.

दुर्गम पहाडी भागात होणारे रस्ते बांधणीचे काम अत्यंत प्रतिकूल हवामानात चालते. येथे निसर्ग शत्रूच्या रूपात असतो. क्षणात होत्याचे नव्हते होते. निसर्ग आणि माणूस यांची रस्सीखेच जशी या कादंबरीत येते तशी माणसामाणसातील रस्सीखेच दिसून येते.

एका बाजूस हिमालय आणि लहरी निसर्ग आणि दुसऱ्या बाजूला वेगवेगळी स्वभाववैशिष्टे असलेली अनेक माणसे; मात्र ही सारी माणसे एकाच जिद्दीची. निसर्गात आणि माणसात जशी येथे रस्सीखेच आणि संघर्ष तसाच प्रसंगी माणसामाणसात सातत्याने चालूच असतो. ह्या कादंबरीत या अशाच माणसांची कथा गुंफली आहे.

या कादंबरीचे कथानक चित्रपटकथेसारखे आहे. विविध दृश्ये, एकदम उत्कंठावर्धक प्रसंग, खटकेबाज संवाद, माणसाच्या स्वभावाचे विविध नमुने, रूबाब दाखवणारे अधिकारी, कामसू व दारिद्रयात बुडालेले कामगार, भयानक कडे कोसळणी व या सर्वांच्या तळाशी वाहणारा एक अनंत प्रवाह यांचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत प्रभाकर पेंढारकर यांनी केले आहे.

---

**संदर्भ ग्रंथ**

१) मराठी कादंबरी आस्वादयात्रा : संपादक विजया राजाध्यक्ष, पॉप्युलर प्रकाशन पुणे या ग्रंथातील रारंग ढांग या कादंबरीवरील डॉ. दिलीप घोंडगे यांचा लेख

२) विचारनामा (समीक्षा) : प्रा. डॉ. सुहासकुमार बोबडे, श्रीसमर्थ प्रकाशन पुणे.

३) 'रारंग ढांग' : प्रभाकर पेंढारकर, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई. अठरावी आवृत्ती, २०१९.

........................................................................................................................................

HRM MARATHI SDS